महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३४

# महाराजा सयाजीराव आणि प्राच्यविद्या

## सौरभ गायकवाड



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३४

# महाराजा सयाजीराव आणि प्राच्यविद्या

सौरभ गायकवाड

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि प्राच्यविद्या
इतिहास
सौरभ गायकवाड
●
प्रकाशन क्रमांक - ५४
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : सौरभ गायकवाड,
महाडीक कॉलनी, टोप,
ता. हातकणंगले, जि कोल्हापूर,
पिन कोड – ४१६१२२
मो. ९१७५००१८६२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३९ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव
# आणि
# प्राच्यविद्या

आपल्या समाजाचा इतिहास जाणून घेण्यासाठी मनुष्याला प्राचीन ग्रंथ व हस्तलिखिते मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरतात. या प्राचीन ग्रंथ व हस्तलिखितांचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा ‘प्राच्यविद्या’ (Oriental studies) म्हणून ओळखली जाते. प्राच्यविद्येमध्ये भारतीय तसेच अन्य पौर्वात्य राष्ट्रांच्या संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान यांच्या अध्ययनाचा व संशोधनाचा प्रामुख्याने समावेश केला जातो. वैदिक धर्माव्यतिरिक्त जैन, बौद्ध, इस्लाम इ. धर्मांचा आणि संस्कृत व्यतिरिक्त पाली, प्राकृत व अन्य प्रादेशिक भाषांच्या अध्ययन व संशोधनाचाही प्राच्यविद्येमध्ये समावेश होतो. १८ व्या शतकात युरोपातील प्रबोधन युगात या ज्ञानशाखेचा प्रामुख्याने विकास झाला.

आधुनिक भारतात सर विल्यम जोन्स या ब्रिटिश अभ्यासकाने प्राच्यविद्येच्या अभ्यासाला संस्थात्मक रूप दिले. याच कालखंडात पाश्चात्य अभ्यासकांबरोबर भारतीय अभ्यासकांची पहिली पिढी तयार झाली. भारतात विविध ठिकाणी प्राच्यविद्या

संस्था उदयाला आल्या. १८८७ ला सयाजीरावांनी पहिला परदेश प्रवास केला. परदेशात त्यांनी विविध ज्ञानशाखांचा अभ्यास करणाऱ्या संस्था पाहिल्या. जगप्रवासातून महाराजांनी सुंदर कल्पना, धोरणे, संस्था इ. भारतात आणल्या. हे करत असताना महाराजांनी पाश्त्यांची नक्कल केली नाही तर भारतीय पर्यावरणात आपल्यातील सत्वशील परंपरा या नव्या विचाराशी जोडून या नव्या ज्ञानाला 'देशी' आत्मा दिला. प्राच्यविद्येच्या क्षेत्रातसुद्धा हिंदू, जैन, बौद्ध या आपल्या प्राचीन धर्म आणि संस्कृतीतील हस्तलिखितांचा अनमोल ठेवा जपणे आणि त्याच्या अभ्यासाला गती देणे या भूमिकेतून अगदी १८९३ पासून प्रयत्न सुरू केले. त्यांच्या समकालीन इतर राजांशी तुलना करता काही किरकोळ अपवाद वगळता प्राच्यविद्या संवर्धनात सयाजीरावांएवढे मूलभूत काम दुसऱ्या कोणत्याही राजाने केलेले नाही.

## भारतातील प्रमुख प्राच्यविद्या संस्था

बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेच्या कामाचा आढावा घेत असताना आधुनिक भारतातील प्राच्यविद्येच्या क्षेत्रातील काम समजून घेणे आवश्यक ठरते. कारण आपल्याकडे आजही प्राच्यविद्या हा विषय फारसा चर्चिला जात नाही. याबरोबरच बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेच्या कामाचे वेगळेपण समजून घेत असताना ते भारतील इतर प्राच्यविद्या संस्थांच्या कामाशी तुलना करून समजून घेतले तर त्याचे वेगळेपण आणि महत्त्व अधिक

समर्पकपणे सांगता येईल. भारतातील प्रमुख प्राच्यविद्या संस्थांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. एशियाटिक सोसायटी, कोलकत्ता (१७८४), द गव्हर्नमेंट संस्कृत कॉलेज, कोलकत्ता (१८२४), अद्यर लायब्ररी ॲन्ड रिसर्च सेंटर, चेन्नई (१८८६), ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट, म्हैसूर (१८९१), विश्वेश्वरानंद विश्वबंधू इन्स्टिट्यूट ऑफ संस्कृत ॲन्ड इंडोलॉजिकल स्टडीज, पंजाब (१९०३), मद्रास संस्कृत कॉलेज, (१९०५), मिथीक सोसायटी, बेंगलोर (१९०९), ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट ॲन्ड मॅन्युस्क्रिप्ट लायब्ररी, त्रिवेंद्रम (१९११), संस्कृत साहित्य परिषद, कोलकत्ता (१९१६), भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे (१९१७), ओरिएन्टल इन्स्टिट्यूट, बडोदा (१९२७), संस्कृत अकादमी, चेन्नई (१९२७) इ.

## बडोद्यातील प्राच्यविद्या संशोधनाचा आरंभ

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी भारतातील प्राच्यविद्येच्या प्रसारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आपल्या प्राचीन संस्कृतीचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने प्राचीन ग्रंथाच्या हस्तलिखित पोथ्यांचा संग्रह, संरक्षण आणि संपादन करण्याचे महत्त्व महाराजांनी जाणले होते. १८८७ च्या पहिल्या युरोप दौऱ्यात असताना सयाजीरावांनी दुर्मिळ संस्कृत हस्तलिखिते जमा करण्याच्या सूचना पत्र लिहून दिवाणांना दिल्या होत्या. यावरून प्राचीन ग्रंथांचे संवर्धन करण्याची दृष्टी अगदी राज्यकारभार हाती

घेतल्यानंतर ७ व्या वर्षी म्हणजेच वयाच्या २४ व्या वर्षी महाराजांमध्ये स्पष्टपणे आढळते. ही बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेची खऱ्या अर्थाने पायाभरणीच होती. पुढे १८९३ मध्ये पाटण येथील जैन भांडारात सापडलेल्या हस्तलिखितांच्या संवर्धनाची व त्या हस्तलिखितांवरील अभ्यासाची सुरुवात झाली. हा बडोद्यातील प्राच्यविद्या संशोधनाचा आरंभ होता. याचवर्षी बडोद्यातील विठ्ठल मंदिरातील संस्कृत हस्तलिखितांचा संग्रह करण्यात आला. १९१० नंतर या संस्कृत हस्तलिखितांचे संवर्धन बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररीत करण्यात आले. यासंग्रहात महाराजांचे बंधू संपतराव गायकवाड यांच्या ६३० छापील वैयक्तिक ग्रंथसंग्रहाची भर पडली. पुढे यज्ञेश्वर शास्त्री यांच्या ४४६ हस्तलिखितांसह छापील ग्रंथ याचबरोबर महाराणी चिमणाबाई यांच्याकडून राजवाड्यातील ५ चित्रांची धातुपट्टी या संग्रहास भेट मिळाली. यामध्ये महाभारत (लांबी २२८ फूट), भागवत (लांबी ८४ फूट), भगवद्गीता (लांबी १०॥ फूट) आणि हरिवंश (लांबी ४८ फूट) यांचा समावेश आहे. प्रारंभी पाटण व इतर काही ठिकाणाहून हस्तलिखितांचे संकलन, अध्ययन व अनुवादाची जबाबदारी महाराजांनी मणिभाई, नभुभाई द्विवेदी, अनंतकृष्ण शास्त्री यांच्यावर सोपविली.

अनंतकृष्ण शास्त्री यांच्याकडे संपूर्ण भारतभर फिरून प्राचीन हस्तलिखिते जमा करण्याची जबाबदारी देण्यात आली. सात वर्षांच्या भ्रमंतीतून त्यांनी १०,००० हस्तलिखिते जमा केली.

या सर्व प्रयत्नातून १९३३ पर्यंत १३,९८४ हस्तलिखितांचा संग्रह बडोदा प्राच्यविद्या संस्थेकडे उपलब्ध झाला. हा संग्रह भारतातील सर्वोत्तम संग्रहांपैकी एक मानला जातो. दागिने पुन्हा बनविता येतात मात्र एखादी पोथी नष्ट झाली म्हणजे त्यातील ज्ञानच संपुष्टात येते. त्यामुळे पोथ्या या स्वत:च्या आभूषणांपेक्षा अधिक महत्त्वाच्या आहेत असे महाराज मानत. म्हणूनच महाराजांनी स्वत:चे दागिने ठेवण्याच्या लंडनच्या कंपनीने तयार केलेल्या अग्नी संरक्षक कवच असलेल्या अतिशय मोठ्या तिजोऱ्या हस्तलिखित पोथ्यांचे जतन करण्यासाठी प्राच्यविद्या मंदिरासाठी दिल्या होत्या.

सयाजीराव महाराजांनी आपल्या साक्षर जनतेला ज्ञानी बनविण्याच्या उद्देशाने आपल्या ६४ वर्षांच्या कारकीर्दीत विविध ग्रंथमाला सुरू केल्या. त्यातील काही प्रमुख ग्रंथमाला पुढीलप्रमाणे होत्या. बाल ज्ञानमाला, बाल संगीतमाला, ज्ञानमंजूषा, प्राचीन काव्यमाला, राष्ट्रकथामाला, महाराष्ट्र ग्रंथमाला, पाकशास्त्रमाला, क्रीडामाला इ. या सर्व ग्रंथ मालांच्या माध्यमातून आपल्या जनतेला बुद्धिवादी आणि विज्ञाननिष्ठ नागरिक बनविण्यासाठी सयाजीरावांनी अविरत प्रयत्न केले. या मालांव्यतिरिक्त काही ग्रंथ स्वतंत्रपणे प्रकाशित केले होते. त्याचबरोबर संस्कृत संशोधनाशी संबंधित हिंदू-धर्म-शास्त्रमाला (Hindu Law Series) आणि २४ खंडात असणारी पाटण हस्तलिखिते भाषांतरमाला दोन विशेष ग्रंथमाला देखील होत्या.

## ‘गायकवाड ओरिएन्टल सिरिज’

सप्टेंबर १९१४ मध्ये संस्थानातर्फे आदेश काढून सी.डी. दलाल यांच्या नेतृत्वाखाली पाटण आणि इतर जैन भांडारांचे सर्वेक्षण करून घेतले. सी.डी. दलाल यांनी दिलेल्या अहवालावरून तेथे सापडलेल्या दुर्मिळ कागदपत्रांचे प्रकाशन करण्यासाठी ‘गायकवाड ओरिएन्टल सिरिज’ या विशेष मालेची सुरुवात १९१५ मध्ये केली. त्यानुसार ही माला पाश्चात्य संशोधन पध्दती आणि प्रकाशन संहितेनुसार हस्तलिखितांच्या संशोधित आवृत्या प्रकाशित करू लागली. १९१६ मध्ये या मालेतील राजशेखर कृत ‘काव्यमीमांसा’ हा पहिला ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथाची १९२४ - दुसरी आवृत्ती (१००० प्रती) आणि १९३६ - तिसरी आवृत्ती (१००० प्रती) निघाली. पाटण आणि जेसलमेर वगळता संपूर्ण भारत आणि परदेशातसुद्धा त्यावेळी ‘काव्यमीमांसा’ हा ग्रंथ उपलब्ध नव्हता. या ग्रंथाची गायकवाड ओरिएन्टल सिरिजमध्ये प्रकाशित झालेली जगातील एकमेव प्रत ठरली. ‘काव्यमीमांसा’ या ग्रंथाच्या सुरुवातीस पाटण येथे सापडलेले १३ व्या शतकातील ‘काव्यमीमांसा’ चे ताडपत्र समाविष्ट करण्यात आले आहे. यावरून आपल्याला या ग्रंथाचे अनन्य स्थान सहज लक्षात येते.

सुरुवातीला या मालेत प्रत्येक ग्रंथाच्या फक्त ५०० प्रती छापल्या जात. त्यापैकी १२५ प्रती वाचनालयांना व संशोधकांना मोफत वाटल्या जात असत. हळूहळू ‘गायकवाड ओरिएन्टल

सिरिज' पाश्चात्य संशोधन पध्दती आणि प्रकाशन संहितेनुसार हस्तलिखितांच्या संशोधित आवृत्या प्रकाशित करू लागली. हिंदू, बौद्ध, जैन या प्रमुख भारतीय धर्मांच्या दुर्मिळ आणि मौलिक हस्तलिखितांचे चिकित्सक संपादन आणि प्रकाशनाचे ऐतिहासिक काम या संस्थेच्या माध्यमातून सयाजीरावांनी केले. यामध्ये गुजराथी, संस्कृत, पाली, अर्धमागधी, अरेबिक आणि पोर्तुगीज भाषेतील ग्रंथांचा समावेश आहे. १९१६ ते १९३९ अखेर या ग्रंथमालेत ८४ ग्रंथ प्रकाशित झाले. सयाजीरावांच्या मृत्यूनंतर आजअखेर ही माला सुरू असून १८७ ग्रंथ या मालेत प्रकाशित झाले आहेत. या ग्रंथमालेत प्रकाशित केलेल्या ग्रंथांच्या दर्जामुळे बडोदा प्राच्यविद्या संस्थेने आंतरराष्ट्रीय मान्यता मिळविली होती आणि आजही ती कायम आहे. अत्यंत कमी काळात 'गायकवाड ओरिएन्टल सिरिज'चा आंतरराष्ट्रीय दबदबा एवढा होता की महाराज एकदा लंडनच्या इंडिया ऑफिस ग्रंथालयात गेले असता या सिरिजचे प्रणेते म्हणून त्यांना प्रथम प्रवेश देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

बडोदा संस्थानचे पहिले भारतीय लष्कर प्रमुख राजरत्न जनरल नानासाहेब शिंदे होते. नानासाहेब शिंदेंच्या 'घोड्यावरील मर्दानी खेळ' या ग्रंथात मराठा साहित्य संमेलनाच्या १९ व्या अधिवेशनात नानासाहेब शिंदेंनी केलेले भाषण प्रसिद्ध आहे. या भाषणात बडोदा प्राच्यविद्या संस्थेचे आणि गायकवाड ओरिएन्टल सिरिजचे महत्त्व अधोरेखित करताना नानासाहेब शिंदे म्हणतात,

“संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारी सुविख्यात “गायकवाड प्राच्य ग्रंथमाला” (गायकवाड ओरिएन्टल सिरिज) आज सुधारलेल्या सर्व जगात प्रसृत असून, तिने संस्थानाला सर्व जगात अखंड कीर्ती प्राप्त करून दिली आहे. अभ्यासयुक्त संस्करणानंतर अनेक पोथ्या, पुस्तके ही संस्था प्रसिद्ध करते. प्राचीन हिंदी, संस्कृती व इतिहास यांना उपकारक अशी महत्त्वाची व मौलिक साधने या मालेतून प्रसिद्ध झाली असून, नष्टप्राय समजले गेलेले किती तरी ज्ञान या संस्थेने विस्मृतीतून प्रकाशात आणले आहे.”

जगभरातील अनेक नामवंत व्यक्ती व नियतकालिकांचे ‘गायकवाड ओरिएन्टल सिरिज’विषयीचे विशेष अभिप्राय उपलब्ध आहेत. या सिरिजविषयी ‘फ्रेंच स्कूल ऑफ ओरिएन्टॅलिस्ट’चे डीन सेल्व्हिन लेवी म्हणतात, “भारतात सध्या प्रकाशित होणाऱ्या अशा सिरिजमध्ये ही सिरिज सर्वश्रेष्ठ आहे.” लंडनमधील ‘एशियाटिक रिव्हू’ या नियतकालिकाने, “पौर्वात्य देशातील अशा सिरिजमधील ही एक सर्वोत्तम सिरिज आहे.” असा उल्लेख केलेला आढळतो. तर ‘द लंडन टाइम्स’च्या साहित्यविषयक पुरवणीमध्ये ‘गायकवाड ओरिएन्टल सिरिज’विषयी महत्त्व अधोरेखित करताना केलेला उल्लेख पुढीलप्रमाणे आहे. “पाश्चात्य ज्ञान व्यवस्थेसाठी ही एक मौल्यवान उपलब्धी आहे. याचे श्रेय संपादकांबरोबर सयाजीरावांनाही आहे.”

## 'गायकवाड ओरिएन्टल सिरिज' मध्ये प्रकाशित ग्रंथ

तंत्रशास्त्राची परशुराम कल्पसूत्र, नित्योत्सव, तूचभास्कर ही पुस्तके, बौद्धशास्त्राची साधनमाला, तत्त्वसंग्रह, अद्वयवज्रसंग्रह, वज्रयानग्रंथद्वय, प्राचीन बौद्धतन्तग्रन्था, तथा गतगुह्यकगुह्यसमाजतंत्र, शक्तिसंगमतंत्र, प्रज्ञापारमिता, निष्कत्रयोगवली, जैनदर्शनाची कुमारपालप्रतिबोध, त्रिष्टिशलावारपुरुषचरित, अनेकान्ता विजयपताका, द्वारशारनयचक्रम, विज्ञान तंत्रज्ञानासंबंधी गणिततिलक, सूर्यदासकृतसूर्यप्रकाश (भास्कराचार्याकृत बीजगणितव्याख्या), विष्णुधर्मोत्तपुरापुराण समरागंणसूत्रधार, अपराजितपृच्छा, मानसोल्लास, अभिनव भारतीय व्याख्येसह नाट्यशास्त्र चार भाग, संगीतमकरन्द, संगीतचुडामणि, वीणालक्षण गन्धसार इत्यादी व उर्दू- पर्शियन इत्यादी पुस्तकांमध्ये मिरात - ई - अहमदी, असन तवारिख, तारिख इ मुबारकशाही, उत्त कुराणशब्दकोश, रेल्ह ऑफ इब्न बुट्टा, अरेबिक हिस्ट्री ऑफ गुजरात, फातुहत - इ आलमगिरी अशा पुस्तकांचा यामध्ये समावेश करता येईल.

या ग्रंथमालेत भरतमुनींचे नाट्यशास्त्र (अभिनव गुप्तांच्या टीकेसहित), सोमदेवकृत मानसोल्लास (अभिलषितार्थ चिन्तामणि), धारानरेश भोजकृत समरांगणसूत्रधार वगैरे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. या मालेत १९३८ मध्ये प्रकाशित झालेला 'The Foereign Vocabulary of the Qua'ran' हा ग्रंथ सयाजीरावांचा इस्लाम धर्मविषयक सकारात्मक दृष्टीकोन

स्पष्ट करतो. परमानंद गोविंद नेवासकर यांनी 'अनुपुराण' (म्हणजे शिवभारत) हे शिवचरित्र लिहिले. त्यांचा पुत्र देवदत्त व नातू गोविंद यांनी संभाजी महाराजांविषयी केलेले संस्कृत काव्यलेखन म्हणजे 'परमानंदकाव्यम्' होय. या काव्याला 'परमानंदकाव्यम्' असे नाव गो. स. सरदेसाई व जदुनाथ सरकार यांनी १९५२ मध्ये मूळ संस्कृत संहिता 'गायकवाड ओरिएन्टल सिरिज' मध्ये प्रसिद्ध करतेवेळी दिले होते.

## प्राच्यविद्यामंदिर : अधिकृत स्थापना

१८९३ मध्येच महाराजांनी या संस्थेच्या पायाभरणीला सुरुवात केली. सुरुवातीस ही संस्था बडोदे येथील वाचनालयाचा एक भाग (संस्कृत विभाग) म्हणूनच कार्यरत होती. 'गायकवाड ओरिएन्टल सिरिज' च्या माध्यमातून केलेल्या कामातील प्रगती विचारात घेऊन १ सप्टेंबर १९२७ मध्ये 'बडोदा प्राच्यविद्या मंदिर' ही स्वतंत्र दर्जा असणारी संस्थेची विधिवत सुरुवात महाराजांनी केली. हस्तलिखितांचा संग्रह, छापील/प्रकाशित पुस्तके, भाषांतर विभाग इ. प्राच्यविद्या संस्थेतील प्रमुख विभाग होते. प्राच्यविद्या संस्थेच्या स्थापनेवेळी या संस्थेचे पुढील उद्देश स्पष्ट करण्यात आले होते. १) प्राचीन हस्तलिखितांचे अद्ययावत ग्रंथालय विकसित करणे. २) प्राच्यविद्येच्या विद्यार्थ्यांच्या संशोधनाला चालना देणे. ३) धर्म आणि तत्त्वज्ञानाची प्राचीन व मौल्यवान संपत्ती जतन करणे. ४) संस्कृत आणि इतर प्राचीन भाषांमधील अस्सल साहित्य प्रकाशित करून प्राचीन भारताचा

इतिहास आणि संस्कृतीच्या अभ्यासाला मूळ साधने उपलब्ध करून देणे. ५) भाषांतर शाखेच्या माध्यमातून सर्व विषयातील प्रमाणभूत ग्रंथ अनुवादित करून वेगाने बदलणाऱ्या आधुनिक जगात आपल्या देशाला योग्य स्थान मिळवून देणे. इ.

मध्यवर्ती वाचनालयातील संस्कृत विभागाचे प्रमुख चिमणलाल दलाल यांना प्राच्यविद्या संस्थेचे प्रथम संचालक होण्याचा बहुमान मिळाला. पुढे ही जबाबदारी बिनोयतोष भट्टाचार्य यांच्याकडे सोपविण्यात आली. महाराजांनी भट्टाचार्यांना ज्या उद्देशाने प्राच्यविद्या संस्थेची जबाबदारी दिली होती तो उद्देश भट्टाचार्यांनी परिपूर्ण साध्य केला.

## बिनोयतोष भट्टाचार्य

हे बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायावरील अधिकारी पंडित म्हणून जग विख्यात आहेत. १९२४ मध्ये सयाजीरावांनी त्यांना प्राच्यविद्या संस्थेच्या गायकवाड ओरिएंटल सिरिजचे संपादक म्हणून बडोद्यात आणले. १९२७ ला त्यांना प्राच्यविद्या संस्थेचे संचालक केले आणि १९५२ ला ते या पदावरून निवृत्त झाले म्हणजे एकूण २९ वर्षे हा बौद्ध पंडित बडोद्यात होता. यांच्या कारकीर्दीत प्राच्यविद्या संस्थेने वेगाने प्रगती केली. महाराजांनी त्यांच्या विद्वत्तेचा सन्मान म्हणून भट्टाचार्यांना ‘राजरत्न’ व ‘ज्ञानज्योती’ या पदव्या दिल्या होत्या. मूळचे बंगालचे असणारे भट्टाचार्य ‘बडोद्याचे भट्टाचार्य’ म्हणून जगभर ओळखले जात

होते. ब्राह्मणी, जैन आणि बौद्ध या तिन्ही धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासातून त्यांनी बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायाचे अनन्य महत्त्व उजेडात आणले.

ज्याप्रमाणे हिंदू तंत्र संप्रदायाने बौद्ध धर्मातील वज्रयानातून तांत्रिक संप्रदाय उसना घेतला आहे त्याचप्रमाणे महायान पंथातील तत्त्वज्ञांनी हेतुत: आणि जाणीवपूर्वक हिंदू देवता बौद्ध तंत्राशी जोडून घेतल्या. मध्ययुगीन हिंदू परंपरेतील शक्ती देवता आणि महायान पंथातील प्राज्ञ (Prajna) या देवतांमधील साम्य भट्टाचार्यांनी शोधून काढले. त्यांचे हे सर्व योगदान एकूणच बौद्ध धर्माच्या बुद्धोत्तर तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करते. भट्टाचार्यांचे हे योगदान पाहता सयाजीरावांनी २९ वर्षे बडोदा प्राच्यविद्या संस्थेचे संचालक म्हणून कार्यरत असणाऱ्या बिनोयतोष भट्टाचार्य यांचे पुढील ग्रंथ या संस्थेने प्रकाशित केले.

बिनोयतोष भट्टाचार्य यांनी संपादित केलेल्या साधनमाला ग्रंथाचा पहिला खंड १९२५ मध्ये तर दुसरा खंड १९२८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथामध्ये वेगवेगळ्या देवतांच्या आराधनेसाठी करावयाच्या विधींची अथवा साधनांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. १९२९ मध्ये भट्टाचार्यांचा 'टू वज्रयान वर्क्स' हा ग्रंथ प्रकाशित करण्यात झाला. या ग्रंथात तांत्रिक बौद्धवादाचा उगम आणि विकासाचा इतिहास मांडण्यात आला. त्याचबरोबर ज्ञानसिद्धी ग्रंथातील उपदेशाचे महत्त्व विशद करण्यात आले आहे. 'गुह्यसमाज तंत्र अथवा तथागतगुह्यक' हा

भट्टाचार्यांनी संपादित केलेला मूळ संस्कृत ग्रंथ १९३१ साली गायकवाड ओरिएन्टल सिरिजमध्ये सर्वप्रथम प्रकाशित करण्यात आला. भारतातील तंत्र संप्रदायाशी संबंधित साहित्याच्या चिकित्सक अभ्यासातील या ग्रंथाचे महत्व अनन्य साधारण आहे. इ.स तिसऱ्या शतकातील असंघ या बुद्धोत्तर महायानी पंथातील तत्त्वज्ञाच्या काळात लिहिल्या गेलेल्या तांत्रिक बुद्ध वादावरील ग्रंथापैकी हा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे.

१९४१ मध्ये 'शक्तीसंगम तंत्र' या ग्रंथाचा दुसरा खंड तर १९४७ मध्ये याच ग्रंथाचा तिसरा खंड प्रकाशित झाला. हा ग्रंथ एकूण ४ खंडांचा होता. 'शक्तीसंगम तंत्र' ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात 'तारा खंड' हे संस्कृत हस्तलिखित संपादित करण्यात आले. तर तिसऱ्या खंडात 'सुंदरी खंड' हे संस्कृत हस्तलिखित संपादित करण्यात आले. या दोन्ही संस्कृत हस्तलिखितांच्या विविध आवृत्या बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेने बंगालची रॉयल एशियाटीक सोसायटी, नेपाळच्या ढाका विद्यापीठातील दरबार लायब्ररीतून संकलित केल्या होत्या. १९४९ मध्ये बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेने प्रकाशित केलेला भट्टाचार्य संपादित 'निष्पन्नयोगावली' हा एक महत्त्वाचा ग्रंथ होता. हा मूळ ग्रंथ विक्रमशीला राजवटीतील अभयकर गुप्त या महापंडिताने लिहिला होता. हा ग्रंथ चीनमधील पिपिंग या शहरात मोठ्या प्रमाणावर सापडलेल्या पुतळ्यांचे विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास भट्टाचार्य यांनी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत व्यक्त केला आहे.

## हस्तलिखितांचा संग्रह

बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेत सध्या ३१ हजार हून अधिक हस्तलिखितांचा संग्रह आहे. यामध्ये सर्व विषयांची, विविध भाषेतील व निरनिराळ्या लिपीत लिहिलेली जवळजवळ २७ विषयांवरील हस्तलिखिते उपलब्ध आहेत. बहुतांश हस्तलिखिते देवनागरीत असली तरी संस्कृतसह मराठी, गुजराथी अशा अन्य आठ लिपीतील हस्तलिखिते सुद्धा येथे आहेत. हस्तोद्योगातील कागद, पट्ट (कापड), भुर्जपत्र, ताम्रपत्र, ताडपत्र इ. प्रकारची हस्तलिखिते येथे पाहवयास मिळतात. अलीकडच्या काळात इतर संस्थांमधून महत्त्वाच्या हस्तलिखितांच्या छायांकित प्रती मिळवून हा संग्रह अधिक समृद्ध झाला आहे. हस्तलिखितांच्या फोटोप्रती तयार करणे हे एक महत्त्वाचे काम असते. यासाठी १९२३ मध्ये बडोदा संस्थानतर्फे या संस्थेला अमेरिकन बनावटीचा छायांकनाचा कॅमेरा (आजच्या भाषेत झेरॉक्स मशीन) देण्यात आला.

भारतात १९४० पर्यंत ग्रंथालयांना हे तंत्रज्ञान परिचितही नव्हते. हे मशीन दिवसाला १०० ताडपत्रावरील हस्तलिखितांच्या फोटोप्रती करून देत असे. अगदी १९४५ पर्यंत हे मशीन उत्तम सेवा देत असे. अभ्यासकांना हव्या त्या हस्तलिखितांच्या छायांकित प्रती देण्याची व्यवस्था येथे करण्यात आली होती. पोथ्यांमध्ये महाकाव्ये, वेद, पुराणे, स्मृती, धर्मशास्त्र, काव्यशास्त्र, व्याकरण, साहित्य, ज्योतिष दर्शनशाखा, कामशास्त्र, छंद:शास्त्र, वास्तु-शिल्पकला, तंत्रके वाङ्मय, बौद्ध वाङ्मय, संगीत

यासारख्या विविध विषयांवरील पोथ्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) आर्थिक साहाय्याने बहुतांशी हस्तलिखितांचे व दुर्मिळ पुस्तकांचे २०१०-११ दरम्यान प्रतिमीय संगणकीकरण झाले आहे. प्राच्यविद्या संस्थेच्या ग्रंथालयाची सेवा विनामूल्य उपलब्ध होती. प्राच्यविद्या संस्थेतील वस्तू, चित्रे, हस्तलिखिते इ. चे प्रदर्शन जिज्ञासूंसाठी उपलब्ध होणे हे एक या संस्थेचे खास वेगळेपण सांगता येईल.

अगदी अलीकडचा संदर्भ म्हणजे २०१९ मध्ये राम जन्मभूमी निश्चित करण्याच्या खटल्यात अलाहाबाद हायकोर्टात वाराणसीच्या 'श्री राम जन्मभूमी पुनरुद्धार समिती'ने जे 'अयोध्या माहात्म्य'चे हस्तलिखित पुरावा म्हणून सादर केले होते. ते १९२७ पासून बडोदा प्राच्यविद्या संस्थेत संरक्षित केले आहे. हे ३६४ वर्षांपूर्वीचे हस्तलिखित आहे. पुढे प्राच्यविद्या संस्थेने हस्तलिखित ग्रंथांच्या चार सूची An Alphabetical List of Manuscripts in the Oriental Institute Vol. I-IV पुस्तकरूपाने प्रकाशित केल्या असून या सूचींमध्ये एकूण २५,००० पोथ्यांचे विवरण करण्यात आले आहे.

## भाषांतर शाखा

भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात भाषांतराचे महत्त्व जाणणारे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे भाषांतरासंदर्भातील कार्य लक्षात घेऊन मातृभाषेला ज्ञानभाषा करणाऱ्या या द्रष्ट्या राजाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. इंग्रजी

भाषेतील लोकोपयोगी, ज्ञानसंवर्धक आणि माहितीप्रधान ग्रंथांचे भाषांतर करण्याची भूमिका महाराजांनी अगदी १८८७ पासून घेतली असल्याचे पुरावे सापडतात. १८८० च्या दशकात मराठीमध्ये स्वतंत्र अभ्यास संशोधकीय लेखक फारच कमी असल्यामुळे जगातील आधुनिक ज्ञान आपल्या प्रजेला मिळवून देण्याचा एकमेव मार्ग म्हणून महाराज भाषांतराकडे पाहात होते. १८८७ मध्ये महाराज जेव्हा आपल्या पहिल्या परदेशवारीवर युरोपला गेले तेव्हा तेथून त्यांनी कॅसलची 'Dictionary of Cookery' हा ग्रंथ मराठीत भाषांतर करण्याचे आदेश दिवाणांना दिले होते.

सयाजीरावांनी भाषांतर शाखेची पायाभरणी १८८८ पासूनच सुरू केली होती. शास्त्रीय शिक्षणाची पुस्तके गुजराथी भाषेत तयार करण्यासाठी १८८८ मध्ये महाराजांनी ५० हजार रु. मंजूर करून प्रो. गज्जर यांच्यावर ही जबाबदारी सोपवली. गज्जर यांनी विविध तांत्रिक व वैज्ञानिक विषयांची पुस्तके गुजराथी व मराठी अशा देशी भाषेतूनच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी 'श्रीसयाजीज्ञानमंजूषा' ही शास्त्रीय ग्रंथमाला सुरू केली. यामुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक अडचणी दूर होऊन प्रत्येक विषयाचे परिपूर्ण ज्ञान त्यांना सहजरित्या घेता येऊ लागले. या मालेतील बाळाजी प्रभाकर मोडक यांच्या 'सृष्टीशास्त्र किंवा पदार्थविज्ञानशास्त्र'(१८९३) या ग्रंथामध्ये 'ध्वनीशास्त्र' व 'प्रकाशशास्त्र' या दोन शास्त्रांचे वर्णन केले आहे. या दोन

शास्त्रांवरील मूलभूत सिद्धांत असणारा हा मराठीतील पहिलाच ग्रंथ आहे. या पुस्तकामध्ये ठिकठिकाणी आकृत्यांचा समावेश करून सोप्या पद्धतीने सिद्धांतांची मांडणी केली आहे. १८९३ मध्ये संस्थानामार्फत विद्वान लेखक नोकरीत ठेवून त्यांच्याकडून ग्रंथ लेखनाचे काम करून घेण्याची व्यवस्था केली.

१९०८ मध्ये विद्याधिकारी खात्याच्या देखरेखीखाली महाराजांनी भाषांतर शाखा नवीन पद्धतीवर स्थापन केली. इंग्रजी ग्रंथांप्रमाणेच संस्कृत भाषेतील उत्तम आणि दैनंदिन उपयोगाच्या पुस्तकांचे मराठी भाषांतर करण्यास सुरुवात झाली. यासाठी श्रावणमास दक्षिणेपैकी ५,५०० रु. दिले. नंतर याच निधीतून धर्मशास्त्रावरील पुस्तके मराठीत प्रसिद्ध करण्यासाठी वार्षिक १० हजार रु. खर्च करण्याचा हुकूम काढला.

१८७८ पासून मराठी ग्रंथकारांचे संमेलन भरवण्यास सुरुवात झाली. १९०९ मध्ये बडोद्यात झालेल्या संमेलनावेळी हे नाव बदलून 'मराठी साहित्य संमेलन' असे व्यापक नामाभिधान देण्यात आले. १९०९ पर्यंत या संमेलनास 'मराठी ग्रंथकारांचे संमेलन' असे नाव होते. मुंबई येथील वनस्पतीशास्त्रज्ञ आणि लेखक के. आर. कीर्तीकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे कीर्तीकर हे मराठी साहित्य संमेलनाचे पहिले ब्राह्मणेतर अध्यक्ष होते. सयाजीराव महाराजांनी संमेलनात प्रत्यक्ष भाग घेतानाच साहित्य प्रकाशनाच्या कार्याकरिता २ लाख रुपयांचा स्वतंत्र निधी बाजूला काढून त्या

रकमेच्या व्याजातून ग्रंथ प्रकाशनाचे कार्य अव्याहत चालू ठेवले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ७० कोटी रु. हून अधिक भरते. तेव्हापासून भाषांतरशाखा नियमितपणे काम करू लागली व तिच्यामार्फत 'श्री सयाजी साहित्य माले'तून विविध विषयांवर पुस्तके प्रसिद्ध होऊ लागली.

१९३१ मध्ये भाषांतर शाखा प्राच्यविद्या संस्थेशी संलग्न करण्यात आली. १९३२ अखेर भाषांतर शाखेसाठी दीड लाख रु. खर्च केले होते. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ३१ कोटी २१ लाखांहून अधिक भरते. त्याचवर्षी बडोदा कॉलेजच्या प्राचार्यांच्या आग्रहावरून बडोद्यात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. संस्थेतील तीन विद्वानांना पदव्युत्तर शिक्षक म्हणून मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली. पुढे पीएच. डी. संशोधनासाठी विद्यार्थी प्राच्यविद्या संस्थेकडे येऊ लागले. भाषांतरित ग्रंथांचे प्रकाशन मुख्यत: ६ ग्रंथ मालांमधून केले जात होते. यामध्ये प्रौढांसाठी 'श्री सयाजी साहित्यमाला', किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी 'श्री सयाजी बालज्ञानमाला', ग्रामीण विकासासाठी 'श्री सयाजी ग्रामविकासमाला', महिलांसाठी 'मातुश्री जमनाबाई स्मारक ग्रंथमाला', बालकांसाठी 'श्री शिशुजनमाला'आणि अखेरची 'द महाराजा सयाजीराव मेमोरियल लेक्चर सिरिज' इ.

## अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद

प्राच्यविद्येच्या प्रसारासाठी १९१९ मध्ये पुणे येथे पहिली अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद आयोजित करण्यात आली होती. आजपर्यंत अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेची ५० अधिवेशने भारताच्या विविध प्रांतात संपन्न झाली आहेत. भारतीय प्राच्यविद्येला बडोद्याने दिलेल्या योगदानाचा सन्मान म्हणजे २७ डिसेंबर १९३३ ची सातवी अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद बडोद्यात आयोजित करण्यात आली. ही परिषद सर्वाधिक यशस्वी ठरली. बडोद्यातील या परिषदेचा १,४०० पानाचा कार्य अहवाल १९३५ मध्ये बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेकडून प्रकाशित करण्यात आला. ही परिषद भारतीय प्राच्यविद्या परिषदेच्या इतिहासातील अत्यंत यशस्वी परिषद मानली जाते. कारण भारताबरोबरच जगभरातून ३८७ प्राच्यविद्यापंडित या परिषदेला हजर होते. या परिषदेत २५० शोधनिबंध सादर करण्यात आले. अगोदरच्या ६ अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेतील सहभागाचा विक्रम मोडणारे हे आकडे आहेत.

या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी महाराजांनी केलेले भाषण महाराजांची याबाबतची भूमिका आणि दृष्टी व्यक्त करते. महाराज म्हणतात, “काही नाही तरी १८ वर्षांपूर्वीच म्हणजे सन १९१५ मध्ये मी आमच्या शास्त्री पंडितांना सांगितले की, तुम्ही पाश्चिमात्य विद्वानांची बरोबरी करण्याचा प्रयत्न करा, आपले

दृष्टिक्षेत्र अधिक व्यापक करा आणि ऐतिहासिकदृष्ट्या विचार करण्यास शिका, थोडक्यात सांगावयाचे तर मी त्यांना असे सुचविले की, तुम्ही आधुनिक बना व समाजाचे तुम्ही उपयुक्त घटक आहात, असे सिद्ध करा."

ज्ञान, विज्ञान आणि संस्कृती संवर्धन या क्षेत्रातील भारतीय मानदंड म्हणजे महाराज होते. अशा कामाला सक्रिय सहभागाबरोबर नैतिक पाठिंबा आणि भक्कम आर्थिक साहाय्य देण्याचे त्यांचे धोरण जगप्रसिद्ध होते. यामुळे या परिषदेचे अध्यक्ष प्राच्यविद्यापंडित डॉ. काशीप्रसाद जयस्वाल यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात महाराजांना राजा भोजची उपमा दिली आहे. जयस्वाल म्हणतात, "आजचे अधिवेशन महाराज गायकवाड, अथवा अर्वाचीन काळचे राजा भोज यांच्या उदार आश्रयाखाली भरत आहे, ही गोष्ट इतिहासात चिरस्मरणीय अशीच मानली जाईल. भोज राजाच्या राज्याप्रमाणेच महाराजांच्या राज्यातही अशिक्षित मनुष्य क्वचितच आढळेल. भोज राजाने प्राचीन हिंदू वाङ्‌मयातील अमूल्य ग्रंथ तत्कालीन लोकांना आपल्या प्रबंधांच्या व कोश ग्रंथांच्या द्वारा उपलब्ध करून दिले, तेच कार्य महाराजही आपल्या 'गायकवाड ओरिएंटल सिरिज' मधील ग्रंथांच्याद्वारे करीत आहेत."

जयस्वाल यांनी महाराजांबद्दल काढलेले वरील उद्गार ही स्तुतीसुमने नसून महाराजांनी या क्षेत्रात केलेल्या अद्वितीय कामाचा गौरव आहे. या परिषदेसाठी महाराजांनी १० हजार

रु. चे अनुदान दिले होते. त्याचप्रमाणे या परिषदेचा अहवाल छापण्यासाठी स्वतंत्रपणे ३ हजार रु. दिले होते. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम २ कोटी ४८ लाख ४० हजार रु. इतकी होते. आज लोकांना अविश्वसनीय वाटेल असे हे दातृत्व आहे. ज्ञानाच्या लोकशाहीकरणाचा सयाजीरावांचा ध्यास यातून प्रतीत होतो. या परिषदेच्या पहिल्या दिवशीचा कार्यक्रम संपल्यावर दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी विविध विषयांच्या शाखासभा भरत होत्या, त्यांना हजर राहून महाराजांनी आपली ज्ञानलालसा व्यक्त केली. या शाखांत पुराण संशोधन, वैदिक संस्कृत, मानवंशशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, तुलनात्मक भाषाशास्त्र, ललितकला, अवेस्ता, अरेबिक, फारशी, गुजराथी, मराठी व हिंदी या अवाचीन भाषा इत्यादी विभाग होते. यावरून या परिषदेच्या व्यापक स्वरूपाची कल्पना येऊ शकेल.

याशिवाय अनेक विषयांवरील व्याख्याने, संस्कृतांतून चर्चा करणारी पंडित परिषद, संस्कृत नाटकाचा प्रयोग, उर्दू काव्यरचनेची चढाओढ करणारा मुशाहिराचा समारंभ वगैरे अनेक उद्बोधक व आकर्षक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यापैकी बऱ्याच कार्यक्रमांना स्वतः महाराजांनी उपस्थिती लावून आपली विद्याभिरुची व्यक्त केली.

## सयाजीराव आणि भांडारकर प्राच्यविद्यामंदिर

महाराष्ट्रातील विद्वानांच्या नव्या पिढीला पुण्याचे भांडारकर प्राच्यविद्यामंदिर परिचित आहे. भारतातील अग्रगण्य आणि आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या या संस्थेच्या पायाभरणीत सयाजीरावांचे आर्थिक आणि बौद्धिक योगदान आहे हे महाराष्ट्राला अपरिचित आहे. १९१७ मध्ये भांडारकर प्राच्यविद्या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेचे संकल्पक डॉ.श्रीपाद बेलवलकर हे ही संस्था स्थापन करण्याची कल्पना घेऊन १९१६ मध्ये महाराजांना भेटले होते. या भेटीमागचे कारण म्हणजे आर्थिक साहाय्य मिळावे हेच होते.

यावेळी महाराजांशी झालेल्या चर्चेत बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेच्या तयारीची बेलवलकरांना कल्पना आली. तसेच बडोद्यात यादृष्टीने झालेले काम त्यांना पाहता आले. यासंदर्भातील हकीकत सांगताना बेलवलकर म्हणतात, “निबंधाच्या प्रारंभी निर्दिष्ट केलेल्या कारणाकरित भांडारकर प्राच्यविद्या संशोधनमंदिराला जरी महाराजांनी केवळ एक हजार रुपयांचीच देणगी दिली असली तरी वरील कार्याला संस्थानांतून दरसाल रुपये ५०० ची मदत आजतागाईत होत आहे. त्याचप्रमाणे दुसरे उदाहरण म्हणजे हिंदुस्थानात दर दोन वर्षांनी भरणारी “ऑल-इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स्” चीं अधिवेशने ही होत. संस्थानांतून अधिवेशनास नियमित देणगी देण्यात येते व पुढले म्हणजे सातवे अधिवेशन तर खुद्द बडोद्यातच भरवावयाचे आहे.

...सध्याच्या शास्त्रीय युगांत ज्या विद्येची चांगली निगा कोठेही फारशी होत नाही व हेटाळणी मात्र प्रत्यही होत आहे अशा या गीर्वाण विद्येच्या उत्कर्षाकरिता, तिच्यामधील कालक्रमानुसार दोष काढून टाकून, तिची बळकट पायावर पुनश्च प्रतिष्ठापना व्हावी म्हणून, दर्शविलेल्या अनेक मार्गांनी, श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या कारकीर्दीत यशस्वी प्रयत्न होत असलेले पाहून, सध्याच्या निबीड निराशामय युगांतसुध्दा मनास क्षणभर भावी कालाबद्दल आशेचा ओलावा वाटतो."

२२ मार्च १९३३ मध्ये महाराजांनी भांडारकर प्राच्यविद्या संस्थेला भेट दिली. त्यावेळी झालेल्या सत्कारात उत्तर देताना महाराज म्हणतात, "कोणी कितीही नव्या मताचा असला तरी जुन्या राष्ट्रीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा त्याने सांभाळलाच पाहिजे, हे कार्य संशोधनानेच होत असते. राजेलोक स्वत: विद्वान किंवा संशोधनशास्त्रात निपुण नसतील; परंतु त्यांना या संस्कृतीचा अभिमान असला पाहिजे. तुमच्या संस्थेत चाललेले प्रचंड काम पाहून मला फार संतोष झाला आहे व मी तुमच्या कार्याबद्दलची माझी सहानुभूती कोणत्या ना कोणत्या रीतीने प्रकट करी" महाराजांनी १९१६ मध्ये या भांडारकर संस्थेला स्थापनेसाठी १ हजार रु.ची आर्थिक मदत केली होती.

१९१६ पासून पुढे १९४० पर्यंत एकूण २४ वर्षे वर्षाला पाचशे रुपये वर्षासन असे एकूण १२,००० रु. चे आर्थिक साहाय्य महाराजांकडून करण्यात आले. १९२२ मध्ये या संस्थेला

महाराजांनी महाभारतावरील संशोधनासाठी ५,५०० रुपये दिले. भांडारकर प्राच्यविद्या संस्थेला सयाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत एकूण १८,५०० रुपये आर्थिक साहाय्य केले होते. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४ कोटी ५८ लाख ६२ हजार रुपये इतकी होते. परंतु संस्थेच्या उभारणीत पायाभूत योगदान असणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेत संस्थेचे आश्रयदाते म्हणून सयाजीरावांचा फोटोसुद्धा आपल्याला आढळत नाही याचे नवल वाटते.

## प्राच्यविद्या संस्था महाराजा सयाजीराव विद्यापीठाशी संलग्न

१९४९ मध्ये महाराजा सयाजीराव विद्यापीठाची स्थापना झाली. याच वर्षी प्राच्यविद्या संस्था महाराजा सयाजीराव विद्यापीठाशी संलग्न करण्यात आली. त्यानंतर या संस्थेचे कार्यक्षेत्र पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले. १) अमूल्य आणि दुर्मिळ अशा ३० हजार हस्तलिखित पोथ्यांचे संवर्धन, अभिवृत्ती व सूचीकरण करणे. २) या हस्तलिखितांचे डिजिटायझेशन करणे. या हस्तलिखितांचे तज्ज्ञांकडून संशोधन व संपादन करून गायकवाड ओरिएन्टल सिरिजमध्ये प्रकाशित करणे. ४) रामायण व पुराणांच्या संशोधित आवृत्या प्रकाशित करणे. ५) जर्नल ऑफ ओरिएन्टल इंस्टिट्यूट (इंग्रजी) व स्वाध्याय (गुजराथी) यांचे

नियमित प्रकाशन करणे. ६) 'द महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ओरिएन्टल सिरिज'मध्ये लघु पुस्तकांचे प्रकाशन करणे. ७) विविध ग्रंथ मालांमध्ये दुर्मिळ पुस्तकांचे प्रकाशन करणे.

१९४९ मध्ये जेव्हा महाराजा सयाजीराव विद्यापीठाशी बडोदा प्राच्यविद्या संस्था संलग्न झाली त्यावर्षीपासूनच रामायणाच्या संपादित आवृत्यांच्या प्रकाशनाच्या अनुषंगाने प्रयत्न सुरू करण्यात आले होते. १९५० ते १९७५ या एकूण २५ वर्षे या संपादनाचे काम सुरू होते. यासाठी जगभरातील २,००० पांडव लिपींचा संग्रह करण्यात आला. या प्रकल्पामुळे संपूर्ण महाराजा सयाजीराव विद्यापीठाला जागतिक मान्यता मिळाली. यातील 'द बालाकांड' हा पहिला खंड १९६० मध्ये प्रकाशित झाला. दुसरा खंड 'द अयोध्याकांड' हा १९६२ मध्ये 'द अरण्यकांड' हा तिसरा खंड १९६३ मध्ये 'द किष्किन्धाकांड' हा चौथा खंड १९६५ मध्ये 'द सुंदराकांड' हा पाचवा खंड १९६६ मध्ये 'द युद्धकांड' हा सहावा खंड १९७१ मध्ये आणि सातवा आणि अखेरचा खंड 'उत्तराकांड' हा १९७५ मध्ये प्रकाशित झाला.

कॅलिफोर्निया विद्यापीठातील प्राध्यापक रॉबर्ट गोल्डमन यांनी बडोदा विद्यापीठाने काढलेल्या रामायणाच्या या संपादित आवृत्यांचा इंग्रजी अनुवाद केला आहे. सुकन्या आगाशे यांनी **The Search for Ravanas Lanka - The Geography of Valmiki Ramayana** या संशोधन ग्रंथाचा मूळ आधार म्हणून

रामायणाच्या 'The Valmikis Ramayana Part - 1 to 7' बडोदा आवृत्तीचा आधार घेतला आहे. या ग्रंथाचे वेगळेपण असे की या ग्रंथात रावणाची लंका म्हणजे आत्ताची श्रीलंका हा सिद्धांत खोडून तिचे स्थान मध्यप्रदेश असल्याचा सिद्धांत मांडला आहे. प्राचीन भारताच्या अधिकारी इतिहास संशोधक रोमिला थापर यांनी आगाशे यांच्या या मांडणीची दखल घेत तिचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

बडोदा प्राच्यविद्या संस्थेची दोन नियतकालिके होती. यापैकी १९५१ मध्ये इंग्रजी भाषेतील ‘Journal of Oriental Institute’ हे नियतकालिक सरू करण्यात आले. १९६२ मध्ये गुजराथी भाषेत ‘स्वाध्याय’ हे नियतकालिक सुरू करण्यात आले. आजअखेर प्राच्यविद्या संस्थेने गायकवाड ओरिएन्टल सिरिजमध्ये १८७ ग्रंथ, श्री सयाजी साहित्यमालेत ३८०, सयाजी ग्रामविकासमालेत ३६, मातुश्री जमनाबाई स्मारक ग्रंथमालेत ०८, श्री सयाजी बालजनमाला -२१३, श्री शिशुजनमाला – ०८, महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ओरिएन्टल सिरिज – २५, क्रिटीकल एडिशन ऑफ रामायण ०७, क्रिटीकल एडिशन ऑफ विष्णुपुराण ०२, क्रिटीकल एडिशन ऑफ मार्कंड्येपुराण २ असे एकूण ८६८ ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

आजपर्यंत ८६८ पेक्षा अधिक विविध भाषासाहित्य, संस्कृती, धर्म, ज्ञान, विज्ञान, इतिहास, तत्त्वज्ञान, पुरातत्त्व, संगीत, कृषी,

ग्रामविकास, स्त्रीजीवन, आरोग्य आयुर्वेद, पौराणिक पात्रे, ऐतिहासिक शूरवीर, संतचरित्र वगैरे विविध प्राचीन व अर्वाचीन समाजोपयोगी विषयांची प्रकाशने आहेत. आजसुद्धा प्रतिवर्षी या विभागाद्वारा विविध पुस्तके प्रकाशित होत आहेत. जगातील सर्वोत्तम काम करण्याच्या महाराजांच्या कार्यसंस्कृतीचे प्रतीक म्हणून महाराजांची प्राच्यविद्येतील कामगिरी भारताचा सन्मान वाढवणारी आहे.

संस्थेची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत व्यवस्थित पद्धतीने जतन केलेल्या व दुर्मिळ अशा ५,००० पेक्षा अधिक नवी व जुनी पुस्तके व मासिकांचा संग्रह हा या विभागाचा विशेष आहे. संशोधन, संपादन व अध्यापनासाठी अशा प्राच्यविद्यासंबंधी अनेक विषयांच्या पुस्तकांची गरज सर्वांनाच भासते. त्यामुळे सर्व विद्याशाखेच्या अभ्यासकांना उपयुक्त अशा दुर्मिळ पुस्तकांमधील संदर्भसामग्री मिळत असल्याने हा विभाग भारतीय व विदेशी संशोधनासाठी वरदानरूप ठरला आहे.

## बडोदा प्राच्यविद्या संस्थेचे तुलनात्मक वेगळेपण

तत्कालीन भारताच्या विविध प्रांतात कार्यरत असणाऱ्या इतर १२ प्राच्यविद्यासंस्थांशी बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेची तुलना केली असता सयाजीरावांनी या संस्थेच्या माध्यमातून प्राच्यविद्या संशोधनाच्या क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कार्याचे वेगळेपण आपल्या लक्षात येते.

१) बडोद्याची प्राच्यविद्या संस्था ही बुद्ध धर्मावरील सर्वाधिक मूळ ग्रंथ प्रकाशित करणारी संस्था आहे.

२) सयाजीरावांनी या संस्थेच्या माध्यमातून सुरुवातीपासूनच अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदांना सर्वाधिक साहाय्य केले.

३) २७ विषयांच्या हस्तलिखितांचा संग्रह असणारी बडोद्याची प्राच्यविद्या संस्था ही आधुनिक भारतातील आजअखेरची एकमेव प्राच्यविद्या संस्था आहे.

४) १० ग्रंथमाला प्रकाशित करणारी बडोद्याची प्राच्यविद्या संस्था ही आधुनिक भारतातील आजअखेरची एकमेव प्राच्यविद्या संस्था आहे. पंजाबच्या विश्वेश्वरानंद विश्वबंधू इंस्टीट्युट ऑफ संस्कृत इंडोलॉजिकल स्टडीज संस्थेच्या तीनही ग्रंथमाला १९५० नंतर सुरू झाल्या.

५) बडोद्याची प्राच्यविद्या संस्था ही रामायणावरील समीक्षात्मक ग्रंथमाला सुरू करणारी आधुनिक भारतातील पहिली प्राच्यविद्या संस्था आहे.

६) बडोद्याची प्राच्यविद्या संस्था विष्णुपुराण व मार्कंडेयपुराण या पुराणांवरील समीक्षात्मक ग्रंथमाला सुरू करणारी भारतातील पहिली प्राच्यविद्या संस्था ठरते. पंजाबच्या विश्वेश्वरानंद विश्वबंधू इंस्टीट्युट ऑफ संस्कृत इंडोलॉजिकल स्टडीज या संस्थेकडून वैदिक ग्रंथावरील समीक्षात्मक ग्रंथ प्रकाशित करण्याची तयारी सुरू करण्यात आली होती.

७) आपल्या संग्रहातील हस्तलिखिते, वस्तू, चित्रे इ.चे प्रदर्शन जिज्ञासूंना मोफत उपलब्ध करून देणारी बडोद्याची प्राच्यविद्या

संस्था ही भारतातील पहिली प्राच्यविद्या संस्था आहे.

८) बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेतील हस्तलिखिते संशोधकांना मुक्तपणे उपलब्ध होती. बडोद्यापाठोपाठ स्थापन झालेल्या पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संस्था आणि कलकत्ता येथील संस्कृत साहित्य परिषद या संस्थांनी स्वत:समोरील बडोद्याच्या या आदर्शाचे अनुकरण करत आपल्या संग्रहातील हस्तलिखिते संशोधकांना उपलब्ध करून दिली.

९) संशोधक व वाचकांना हस्तलिखितांच्या फोटोप्रती मोफत उपलब्ध करून देणारी आधुनिक भारतातील आजअखेरची एकमेव प्राच्यविद्या संस्था ठरते.

१०) ज्याला आज आपण झेरॉक्स म्हणतो ते फोटोप्रतीचे तंत्रज्ञान भारतात सर्वप्रथम बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेने वापरात आणले.

११) १७८४ मध्ये स्थापन झालेल्या कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटी या जगप्रसिद्ध संस्थेचे सदस्यत्व सुरुवातीच्या काळात युरोपियन लोकांपुरते मर्यादित होते. या संस्थेने स्थापनेनंतर ३५ वर्षांनी १८२९ पासून भारतीयांना सदस्यत्व देण्यास सुरुवात केली.

१२) याउलट बडोदा प्राच्यविद्या संस्थेच्या स्थापनेपासून संशोधक व वाचकांना मुक्त प्रवेश दिला जात होता.

सयाजीरावांनी आपल्या सर्व क्षेत्रात सर्वोत्तम या धोरणाला अनुसरून प्रत्येक क्षेत्रात जे मानदंड निर्माण केले ते आजही

भारतात मानदंड म्हणूनच विचारात घ्यावे लागतात एवढे पायाभूत काम महाराजांनी आपल्या ५८ वर्षांच्या प्रशासकीय कारकीर्दीत केले. प्राच्यविद्येसारख्या क्षेत्रात महाराजांनी केलेल्या कामाचे भारतातील इतर प्राच्यविद्या संस्थांच्या कामाशी तुलना करून काढलेले वरील निष्कर्ष विचारात घेता बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेने महाराजा सयाजीरावांच्या नेतृत्वाखाली केलेले काम किती मूलभूत होते याची प्रचिती येते. अगदी आजची भारतातील अग्रगण्य भांडारकर इन्स्टिट्यूट जरी विचारात घेतली तरी बडोद्याची प्राच्यविद्या संस्था ही भारतातील सर्वात प्रयोगशील, सर्वसमावेशक आणि रचनात्मक काम करणारी सर्वोत्तम संस्था असल्याचा सिद्धांत प्रस्थापित होतो.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com